वाचा :- 1) या कार्यालयाकडील शिक्षेचा आदेश क्र.आरोग्य/आस्था-5/1521/2015 दि.28/07/2015

2) मा.राज्यमंत्री,ग्रामविकास विभाग,बांधकाम भवन,मंत्रालय मुंबई-01,यांचेकडील पुनरिक्षण अर्जावरील आदेश क्र.डीईएन-2018 प्र.क.124/आस्था-12 दि.14/10/2018

3) या कार्यालयाची मंजूर टिपणी दि. 20/12/2018

---

**आदेश**

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
आरोग्य विभाग
जा.क्र.आरोग्य/आस्था-5/764/2018
दिनांक- 20/12/2018

ज्याअर्थी श्रीम.सुनंदा नारायण चौधरी, आरोग्य सेविका (म),प्राथमिक आरोगय केंद्र. ठाणगांव, उपकेंद्र. हिवरे ता.सिन्नर यांचे विरुध्द प्रस्तावित खाते चौकशी अंती या कार्यालयाचे आदेश क्र.आरोग्य/आस्था-5/1521/2015 दि.28/07/2015 अन्वये श्रीम.चौधरी यांना सध्याच्या कार्यरत असलेल्या पदाच्या वेतनश्रेणीच्या मुळवेतनावर आण्याची शिक्षा देऊन त्यांचे दि.16/09/2008 पासुन ते 31/10/2010 पावेतोचा अनधिकृत गैरहजर कालावधी विनावेतन असाधारण रजा धरण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. श्रीम.चौधरी, यांनी सदरहु दिनांक 28/07/2018 चे शिक्षेच्या आदेशाविरुध्द मा.अप्पर आयुक्त, विभाग नाशिक यांचे कडेस इएमपी अपील क्रं.विमामु-सुनाचौधरी-2015/2015 दाखल केले. सदरचे अपीलावर दि. 19/12/2016 रोजी निर्णय होवुन अपील अमान्य् करण्यात आले. त्यानंतर श्रीम.चौधरी यांनी पुन्हा दिनांक 28/07/2015 चे शिक्षेच्या आदेशाविरुध्द मा.अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस पुर्नविलोकन अर्ज क्र.7/2017 दाखल केले. सदरचे पुर्नविलोकन अपीलावर दिनांक 18/08/2017 रोजी निर्णय होऊन पुर्नविलोकन अर्ज फेटाळण्यात आला आहे. श्रीम.चौधरी, आरोग्य सेविका यांनी सदरचे दोन्ही आदेशाविरुध्द मा.ना.राज्यमंत्री, यांचे कार्यालयास पुर्नरिक्षण अर्ज दाखल केला. सदर प्रकरणांची एकत्रीत सुनावणी दि. 08/05/2018 रोजी मंत्रालय मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सुनावणी अंती मा.ना.राज्यमंत्री यांनी श्रीम.चौधरी यांचा पुर्नरिक्षण अर्ज अशंत: मान्य् करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी दिनांक 28/07/2015 चा शिक्षेचा व असाधारण रजेचा तसेच मा.अपर आयुक्त, नाशिक यांचेही अपील आदेश रद करणेत आले असुन. श्रीम.चौधरी,आरोग्य सेविका यांचे बाबत पुर्नरिक्षण अर्जावरील मा.ना.राज्यमंत्री महोदय यांचे आदेशानुसार खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

त्याअर्थी श्रीम.चौधरी आरोग्य सेविका यांचे विरुध्द सिध्द झालेल्या दोषारोपाच्या प्रमाणानुसार व स्वरुपानुसार यांची महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 चे भाग 3 मधील कलम 4 (2) त्यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांची वेतननिश्चिती करण्यात यावी. त्यांचा गैरहजर कालावधी हा त्यांना दिनांक 15/9/2008 रोजी शिल्लक असलेल्या अर्जित रजा-55 दिवस व अर्धवेतनी रजा-37 दिवसांचा विचार होऊन देय व अनुज्ञेय रजा या खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| 1) दि. 16/09/2008 ते दि. 09/11/2008 | एकूण :- 55 दिवस (खाजगी कारणास्तव) अर्जित रजा.<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 चे कलम 50 (2) नुसार |
| 2) दि. 10/11/2008 ते दि. 16/12/2008 | एकूण :- 37 दिवस अर्धवेतनी रजा.<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 कलम 60 नुसार |
| 3) दि. 17/12/2008 ते दि. 31/10/2010 | एकूण :- 653 दिवसाची असाधारण रजा (विनावेतन).<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 चा कलम 63 नुसार |

सदरची रजा ही कोणत्याही प्रयोजनासाठी विचारात घेतली जाणार नाही मात्र श्रीमती चौधरी यांची या असाधारण सेवेमुळे सेवेत खंड पडणार नसुन सेवा नियमित करण्यात येत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करणेत येवुन आदेशाची नोंद श्रीम.चौधरी,आरोग्य सेविका यांच्या मूळसेवा पुस्तकात घेण्यांत यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नासिक

प्रति,
श्रीम.सुनंदा नारायण चौधरी, आरोग्य सेविका (महिला), कार्यरत प्राथमिक आरोग्य केंद्र.उमराळे,उपकेंद्र. जालखेड, ता.दिंडोरी

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती, --------------
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, --------------
प्रत :- वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र. ------------, ता.---------- जि.नाशिक
प्रत :- म. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
प्रत :- मध्यवर्ती माहिती तंत्र कक्ष (आयटी सेल) सामान्य प्रशासन विभाग,जि.प.नाशिक
प्रत :- आस्थापना-5 आरोग्य विभाग,जि.प.मुख्यालय,नाशिक

स्वाक्षरी XXX

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नासिक